रा.सा.प्रत

FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154130

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District बृहन्मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 22, वर्ष Year 2021, दिनांक Date 29/04/2021

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शुक्रवार, तारीख पासून Date from 15/01/2021 वेळ Time 15:07, तारीख पर्यंत Date to 15/01/2021 Time 16:02 वा.

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 15/01/2021, वेळ Time 09.00वा.

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 08/2021 तारीख Date 29/04/2021, वेळ Time 15:00 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लाचेच्या मागणी संदर्भात लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय इमारत मध्ये, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place महापालिका मार्ग, गाव Village, फोर्ट पोस्ट Post मुंबई, तालुका Taluka 400 001, जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name श्री. शमीम खान
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name कालेमोहम्मद खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 52 वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9321916709
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ...........
   (f) व्यवसाय Occupation ट्रान्सपोर्टर
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address : गल्ली / सर्व्हे नं. Ward 502/503, घर / नाव नं. House/Name No. आकाशदीप, फोन / मो. नं. Phone/Mo. No. १ला मजला, पॅन नं. PAN No. आर.सी.सी. मार्ग, गर्दर्स नं. Card No.
   रस्त्याचे नाव Road मालाड (प), जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मुंबई, गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P. Stn. ...........
   तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   आरोपी लोकसेवक :- संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, डा.क.वा. मनपा मुंबई (मुख्यालय इमारत)

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

फिर्याद दिनांक– २९/०४/२०२१

श्री. शमीम फत्तेमोहम्मद खान, वय ५२ वर्षे, धंदा–ट्रान्सपोर्टर, रा.ठी. ५०२/५०३, आकाशदिप बिल्डिग, आर.बी.बी. मार्ग, माझगाव मुंबई मो.न. ९८२१९१६७०९

---

मी वर नमुदप्रमाणे असुन वरील नमुद पत्यावर मी माझे जन्मापासुन माझे संपुर्ण कुटूबासह रहात आहे. माझा ''सुपरवेझ'' या नावाने माझेकडे असलेली वाहने भाडेतत्वावर देण्याचा व्यवसाय आहे. मी मागील १० वर्षापासुन बृहन्मुंबई महानगरपालिका येथे माझेकडे असलेली वाहने भाडे तत्वावर देत आहे. माझेकडे बृहन्मुंबई महानगरपालिका येथे भाडेतत्वावर देण्यासाठी डंपर आणि टेम्पो असे मिळुण एकुण ३५ वाहने आहेत. सदर वाहनावर चालक आणि वाहनांचे इंधन व देखभाल खर्च यांची व्यवस्था मी करतो व भाडेतत्वावर वापरलेल्या वाहनांचे बिल हे बृहन्मुंबई महानगरपालिका मला निविदेतील ठरलेल्या दराने देत असते.

बृहन्मुंबई महानगरपालिका ही त्यांना आवश्यक असणारी वाहने भाडेतत्वावर घेण्यासाठी निविदा काढत असते. सदरच्या काढलेल्या निविदा कामाची अनामत रक्कम ही बृहन्मुंबई महानगरपालिका घेत असते. सदरच्या निविदाबाबतचे प्रस्ताव हे बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील योग्य त्या चाकोरीमार्फतीने श्री संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, मुंबई व श्री वागराळकर, सह आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, मुंबई यांचेकडे मंजुरी साठी जातात. श्री संजय गोसावी हे त्यांच्या अभिप्रायासह सदर निविदा प्रस्तावच्या फाईल मंजुरीसाठी श्री वागराळकर यांचेकडे पाठवितात. तसेच श्री संजय गोसावी हे माझ्या ''सुपरवेझ'' च्या भरलेल्या निविदांच्या फाईल मंजुरीसाठी त्यांच्याकडे आल्यावर मला त्याबाबत माहिती देत असतात. मी श्री संजय गोसावी आणि श्री वागराळकर यांना चांगल्याप्रकारे ओळखतो.

दिनांक १०/०९/२०२० रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ०७ वर्षाच्या कालावधी करीता भाडेतत्वावर वाहने मिळणेसंदर्भात ऑनलाईन निविदा निघाली होती. मी दिनांक २०/०९/२०२० रोजी माझी कंपनी ''सुपरवेझ'' चे नावाने मला निविदा मिळण्यासाठी मी माझे ३ गटाचे, प्रत्येकी गट ७,३०,०००/– रू असे एकुण सुरक्षा अनामत रक्कम रू २१,९०,०००/– ही ऑनलाईन पध्दतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेस भरलेली होती.

दिनांक २८/१२/२०२० रोजी मला श्री संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, घनकचरा व्यस्थापन, मनपा, मुंबई यांनी मला कळविले की, माझी ''सुपरवेझ'' कंपनीच्या ०३ गटाची निविदा प्रस्ताव फाईल ही त्यांचेकडे आलेली असुन त्यासंदर्भात चर्चा करावयाची असल्याने मला मनपा मुख्यालय, मुंबई येथे येवुन भेटण्यास सांगितले. तेंव्हा मी व माझे सहकारी श्री शिंदे असे दोघेजन बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, फोर्ट, मुंबई येथे श्री संजय गोसावी यांनी बोलविल्यावरुन तेथे गेलो आणि श्री संजय गोसावी यांना त्यांच्या कार्यालयात भेटलो. त्यावेळी बृहन्मुंबई महानगर पालिकेस आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ०७ वर्षाच्या कालावधी साठी भाडेतत्वावर वापरण्यात येणाऱ्या वाहन डंपरच्या मी भरलेल्या निविदेच्या प्रस्तावा बाबत श्री संजय गोसावी यांनी माझेशी चर्चा केली. त्यावेळेस माझे सुपरवेझ कंपनीचे एकूण ०३ गट होते व इतर जणांचे ०५ गट होते. या सर्व ०८ गटाचे मिळुन अंदाजे ३३ करोड रूपये ही निविदा कामाची रक्कम होती. त्यावेळेस श्री. संजय गोसावी यांनी माझे ''सुपरवेझ'' कंपनीच्या ०३ गटाची निविदा प्रस्ताव मंजुर करण्याकरीता १० लाख रूपये दयावे लागतील असे सांगितले. सदरची रक्कम दिल्यानंतरच माझ्या ''सुपरवेझ'' कंपनीच्या ०३ गटाची निविदा प्रस्ताव फाईल्स या वरिष्ठ अधिकारी श्री वागराळकर यांचेकडे

मंजुरीकरीता पाठविणार असे मला सांगितले. त्यानंतर मी श्री.संजय गोसावी यांना १० लाख रू ही खुप जास्त रक्कम होते असे सांगितले. तेंव्हा श्री संजय गोसावी हे मला त्यांचे वरिष्ठ श्री वागराळकर यांचेकडे घेवुन गेले आणि त्यांचेशी माझ्या ''सुपरवेझ'' कंपनीच्या ०३ गटाची निविदा प्रस्ताव मंजुर करण्याच्या फाईलबाबतची चर्चा केली. तेंव्हा श्री वगराळकर हे माझेशी श्री संजय गोसावी यांनी सांगितलेल्या १० लाख रक्कमेबाबत काही बोलले नाहीत. त्यानंतर श्री संजय गोसावी यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले व थोडया वेळाने ते देखील श्री. वागराळकर यांच्या कक्षातुन बाहेर आले आणि मला सांगितले की, श्री. वागराळकर यांनी माझ्या ''सुपरवेझ'' कंपनीच्या ०३ गटाची निविदा प्रस्ताव मंजुर करण्याच्या फाईलचे १० लाख रू दयावे लागतील असे सांगितले. त्यावेळी श्री. संजय गोसावी हे वागराळकर साहेबांचे नाव सांगुन स्वत:साठी १० लाख रू लाचेची मागणी करीत असावेत असा मला संशय आला होता परंतु मी श्री संजय गोसावी यांना विचार करून सांगतो असे सांगुन निघुन गेलो.

मला श्री संजय गोसावी यांना रु. १० लाख लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक १५/०१/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन कार्यालयात प्रत्यक्ष तक्रार देण्यास आलो व मी अॅन्टी करप्शनचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटलो व वरिष्ठांनी माझी तक्रार ऐकूण घेवून माझे तक्रारीवर पुढील कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांची नेमणुक केली व सदर कारवाई दरम्यान योग्य ते मार्गदर्शन व लक्ष देण्याकरीता सहायक पोलीस आयुक्त श्री चिचंकर यांची नेमणुक केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांना मी लेखी तक्रार दिली.

मला पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी मी केलेल्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी केली जाणार असल्याचे सांगुन पंचाना बोलाविण्यात आले. काही वेळाने पंच अॅन्टी करप्शन कार्यालयात आल्यानंतर पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी पंच १) श्री मयुर महादेव सरगर व २) रमेश अंबरसिंग महेर वय ३१ वर्षे, नोकरी – वस्तु व सेवाकर विभाग,(व्यवसाय कर) बान्द्रा पुर्व मुंबई यांची माझेसोबत ओळख करून दिली. त्यानंतर माझी तक्रार पंचाना वाचावयास देण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक अमोल शिंदे यांनी मी दिलेल्या तक्रारीची मला पंच श्री. रमेश अंबरसिंग महेर यांचेसोबत लोकसेवकाचे कार्यालयात पाठवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

मी दिलेल्या लेखी तक्रारीवरून दि.१५/०१/२०२१ रोजी पंचासह डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन श्री संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, मुंबई यांच्या म.न.पा. मुख्यालय फोर्ट मुंबई येथील कार्यालयात पडताळणी करण्यात आली. मी व पंच श्री मयुर महादेव सरगर असे श्री संजय गोसावी यांना त्यांच्या कक्षामध्ये जावुन समक्ष भेटलो असता, त्यांचे वरिष्ठ श्री वागराळकर यांची त्या दिवशी तब्बेत बरी नसल्याने ते कार्यालयात आले नसल्याचे श्री संजय गोसावी यांनी सांगितल्याने त्यांची माझेशी भेट झाली नाही. म्हणुन मी व श्री गोसावी यांनी माझे निवीदा मंजुरी बाबत चर्चा केली त्यावेळी मी त्यांना सांगितले की, वागराळकर साहेब नाहीत तर मग कस करायच, माझे निविदा फाईलचे तुम्ही सांगितल्याप्रमाणे वागराळकर साहेबांनी १० लाख रू सांगितले होते. त्यावर श्री संजय गोसावी यांनी मला सांगितले की, **''तुम्ही सांगा कस करणार आहे मग... तुम्हाला ते.... कितीची अॅरेजमेंन्ट झाली.... सगळी झाली तुमची ...... तुमचे झाले....तुमच्या ग्रुपचे पहिल्या ग्रुपचे झाले का सगळे... फर्स्टची...'' '' अॅग्री,, चला मी साहेबांशी बोलतो.. बस... मी साहेबांशी बोलतो पण एक गोष्ट लक्षात ठेवा...लास्ट कॉल हा बॉसचा असेल... आणि लास्ट कॉल घेताना तुम्ही समोर बसा...'', '' तुम्ही मला आता एक सांगा, ज्यावेळी जेव्हा दहा बोललेले ना तुम्ही ते पहिलच जे सांगितील ना'' तसेच '' तुम्ही सांगा मी सांहेबाना सांगतो, साहेबांनी**

**जर अ‍ॅग्री केल ठिक आहे नाही अ‍ॅग्री केल तर तुम्ही इकडे या विषय संपला,''.** त्यानंतर श्री संजय गोसावी यांनी मला हाताने इशारा करून १० लाख रू घेवुन सोमवार दि.१८/०१/२०२१ रोजी येवुन भेटण्यास सांगितले. तेंव्हा माझी खात्री झाली की, श्री संजय गोसावी हे स्वत:साठीच १० लाख रू लाचेची मागणी करीत आहेत.

त्यानंतर मी दि.१८/०१/२०२१ रोजी श्री संजय गोसावी यांना पुन्हा भेटण्यासाठी पंचासह गेलो असता समक्ष भेट झाली नाही. म्हणुन श्री गोसावी यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता, तेव्हा श्री गोसावी हे चर्चगेट येथे असुन नंतर कॉल करतो असे मला म्हणाले. त्यानंतर त्यांचा माझेशी संपर्क झाला नाही अथवा ते मला समक्ष भेटलेले नाहीत. तसेच श्री संजय गोसावी हे मला भेटतील याबाबत मी त्यांची वाट पाहिली परंतु त्यांनी मला संपर्क केला नाही किंवा मला ते भेटले नाहीत.

त्यानंतर दिनांक २९/०४/२०२१ रोजी पो.नि. शिंदे यांनी मला अ‍ॅन्टी करप्शन ऑफिस ला बोलविल्यावरुन मी हजर झालो. लोकसेवक श्री संजय गोसावी यांचे कार्यालयात जावुन पुन्हा पडताळणी /सापळा कारवाई करण्याबाबत अवगत केले असता, मी सांगितले की, श्री संजय गोसावी हे मला समक्ष भेटणार नाहीत. त्यामुळे पडताळणी/सापळा कारवाई करणे शक्य होणार नसल्याचे पो.नि. शिंदे यांना सांगितले.

लोकसेवक श्री संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, घनकचरा व्यस्थापन, मनपा, मुंबई यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण–घेवाणीचे व्यवहार नाहीत.

तरी दिनांक १५/०१/२०२१ रोजी लोकसेवक श्री संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, मुंबई यांनी त्यांचे लोकसेवक या पदाचा गैरवापर करून स्वत:च्या गैरफायदयाकरीता म.न.पा. मुख्यालय, मुंबई येथील कार्यालयात माझे सुपरवेझ कंपनीच्या ०३ गटाची निविदा प्रस्ताव मंजुर करण्याकरीता सरकारी पंचासमक्ष माझेकडे १० लाख रूपये लाचेची मागणी करुन ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला म्हणुन माझी लोकसेवक श्री संजय गोसावी, प्रशासकीय अधिकारी, घनकचरा व्यवस्थापन, मनपा, मुंबई यांच्याविरुध्द् कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

29/04/2021

(अमोल शिंदे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे चौकशी अंती दाखल / फिर्यादीवरून

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

यातील नमूद ता. वे. व ठि. आलोसे संजय गोसावी यांनी त्यांचे लोकसेवक या पदाचा गैरवापर करून फिर्यादी शमीम खान शेख यांचेकडून गैरफायदा मिळण्याच्या अपेक्षेने फिर्यादी यांच्या "स्टुपरवेज" कंपनीच्या इमारतीची विविध प्रस्ताव मंजूर करण्याकरीता आलोसे संजय गोसावी यांनी फिर्यादीकडे 10 लाख रुपये लाचेची पैसासमक्ष मागणी करून ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला म्हणून कॉलम क्र 7 मधील आलोसे संजय गोसावी यांचेविरुद्ध कलम 7 भ्रष्टाचार प्रति. अधि. 1988 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरीक्षक प्रमोद शिंदे लाप्रवि मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

29/04/2021

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name प्रमोद शिंदे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting लाप्रवि मुंबई.
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Recd F.I.R Copy.
29/04/2021.